महाराष्ट्र शासन
इतर मागासवर्ग व बहुजन कल्याण विभाग, महाराष्ट्र राज्य, मुंबई.
कार्यालय, व्यवस्थापकीय संचालक, महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था
(महाज्योती) , महाराष्ट्र राज्य, नागपूर
पत्ता : डॉ.बाबासाहेब आंबेडकर सामाजिक न्याय भवन, 3 रा माळा, दीक्षाभूमी रोड, श्रद्धानंद पेठ, नागपूर – 440022
दूरध्वनी क्र. 0712- 2870120/121 CIN No. U85300PN2019NPL187405 ई-मेल: mahajyotingp@gmail.com

दिनांक : २३ फेब्रुवारी २०२६

# ‘महाज्योती’ येथे राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची जयंती उत्साहात साजरी

महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती), नागपूर येथे सोमवारी महान संत, थोर कीर्तनकार आणि समाजप्रबोधनाचे अखंड दीप असलेले राष्ट्रसंत गाडगे बाबा यांची १५० वी जयंती उत्साहात साजरी करण्यात आली. कार्यक्रमाची सुरुवात ‘महाज्योती’ चे व्यवस्थापकीय संचालक मा. मिलिंद नारिंगे यांच्या हस्ते राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या प्रतिमेस पुष्पहार अर्पण करून विनम्र अभिवादनाने झाली. याप्रसंगी मुख्य लेखा व वित्त अधिकारी मा. प्रशांत वावगे, लेखाधिकारी मा. रश्मी तेलेवार, सहाय्यक लेखाधिकारी मा. वर्षा अहिर तसेच प्रकल्प संचालक मा. कुणाल शिरसाठे यांची प्रमुख उपस्थिती लाभली.

यावेळी मार्गदर्शन करताना मिलिंद नारिंगे यांनी राष्ट्रसंत गाडगे बाबा यांच्या कार्याचा गौरव करत त्यांच्या विचारांची आजच्या समाजासाठी असलेली प्रेरणा अधोरेखित केली. स्वच्छता, अंधश्रद्धा निर्मूलन, शिक्षण आणि मानवतेचा संदेश देत गाडगे बाबा यांनी समाजात व्यापक जनजागृती केली. त्यांनी आयुष्यभर समाजातील दुर्बल, वंचित आणि गरजू घटकांच्या उन्नतीसाठी कार्य करत स्वच्छतेचा व सामाजिक बांधिलकीचा आदर्श समाजासमोर ठेवला. गाडगे बाबा यांचे विचार आजही समाजासाठी प्रेरणादायी असून त्यांच्या कार्यातून समता, स्वच्छता आणि मानवतेचा संदेश मिळतो. त्यांच्या विचारांचे अनुकरण करून समाजहितासाठी कार्य करणे हीच त्यांना खरी आदरांजली ठरेल, असेही मा. मिलिंद नारिंगे म्हणाले. कार्यक्रमाला प्रकल्प व्यवस्थापक विकास गडपायले, प्रकल्प अधिकारी विकास तिळगुळ, मयूर चव्हाण, पंकज पचारे, कार्यालयीन अधीक्षक शुभम वैलथरे यांच्यासह महाज्योतीचे अधिकारी, कर्मचारी, विद्यार्थी आणि माजी विद्यार्थी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

प्रति,
१) मा. संपादक,प्रिंट, ईलेक्ट्रानिक, डिजीटल माध्यम
२) मा.संचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई
३) मा.जिल्हा माहिती अधिकारी (सर्व जिल्हे)

मा. महोदय,
कृपया उपरोक्त वार्तांकनास आपल्या माध्यमात प्रसिद्धी करावे ही नम्र विनंती.

पंकज पचारे
प्रकल्प अधिकारी
महात्मा ज्योतिबा फुले संशोधन व प्रशिक्षण संस्था (महाज्योती),
महाराष्ट्र राज्य, नागपूर






ISO


ISO
महाज्योती


ISO
महाज्योती


ISO
महाज्योती


ISO
महाज्योती


ISO